# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ 4734 /२०१९ दि.25/११/२०१९

## परिपत्रक

विषय :- शासकीय सोयी सुविधांकरीता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत प्रती स्विकारण्याबाबत...

संदर्भ :- मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र.:संकीण-२०१९/प्र.क्र.११३/ आस्था-२, दिनांक १७/१०/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयाकींत पत्रान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या सुप्रशासन देण्याच्या धोरणाच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दिनांक ०९ मार्च, २०१५ चा शासन निर्णय निर्गमित केला असुन ज्या शासकीय सेवांच्या बाबतीत अधिनियम/नियम यातील तरतुदीनुसार शपथपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती आवश्यक आहेत अशा बाबींखेरीज करून इतर सेवेसाठी शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने ज्या सेवांकरीता शासकीय सोयी/सुविधांकरीता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वंयसाक्षांकित प्रती स्विकारल्या जातात, अशा सेवांची माहिती संलग्नित विहीत प्रपत्रात नमुद करून सादर करणे आवश्यक असल्याने संदर्भीय पत्रान्वये, निर्देशांचे पालन करण्याच्या अनुषंगाने आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घेवुन कार्यवाहीचा अहवाल संबंधीत कार्यालयासोबत विद्यापीठास उपलब्ध करून देण्यात यावा.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**

सहपत्र :- संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सदरहु परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणुन द्यावे व उक्तप्रमाणे कार्यवाहीचा अहवाल विवरणपत्रात नमुद करून सादर करावा.

(डॉ. गो. दा. दुबे)
**उपकुलसचिव**

F:\BBDD\LATTER\Circular/56

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 4307 दि. 16/11/19
जावक क्र.......... दि..........

महाराष्ट्र शासन

तात्काळ/महत्त्वाचे

E mail.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 7078 दि. 7/11/19
जावक क्र. 1647 दि. 16/11/19

क्र:संकीर्ण-२०१९/प्र.क्र.११३/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२
दिनांक: १७.१०.२०१९
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 2384 दि. 05/11/19
जावक क्र. 2949 दि. 07/11/19

प्रति,

Sent by Email

१) संचालक (उच्च/तंत्र/कला/ग्रंथालय), मुंबई/पुणे
२) कुलगुरु/कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे

18/10

विषय : शासकीय सोयी सुविधांकरीता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत...

उपरोक्त विषयाचे दिनांक ०५.१०.२०१९चे सोबत जोडलेले पत्र व सहपत्र कृपया पहावे.

२. महाराष्ट्र शासनाच्या सुप्रशासन देण्याच्या धोरणाच्या अनुषंगाने दिनांक ०९.०३.२०१५चा शासन निर्णय निर्गमित केला असून ज्या शासकीय सेवांच्या बाबतीत अधिनियम/नियम यातील तरतुदीनुसार शपथपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती आवश्यक आहेत अशा बाबींखेरीज करुन इतर सेवेसाठी शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने ज्या सेवांकरीता शासकीय सोयी/सुविधांकरीता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारल्या जातात, अशा सेवांची माहिती विहीत प्रपत्रात दिनांक १८.१०.२०१९ पर्यंत सकाळी ११.०० वाजेपर्यंत न चुकता शासनास त्वरित सादर करावी, असे मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निर्देश आहेत.

सहपत्र: वरीलप्रमाणे.

(द. रा. कहार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

Registrar
Circulate

06/11

उ.कु. (प्रशा)

8/11

Sr. क्लर्क
16/11

F:\Sushilkumar\२०१९\११३_१९ Self attestation.docx

# विवरणपत्र "अ"

मंत्रालयीन विभागाचे नाव :-

अधिनस्त शासकीय कार्यालयाचे नाव :-

| दि. ९/३/२०१५ च्या शासन निर्णयास आपल्या विभागामार्फत व्यापक प्रसिध्दी दिली आहे किंवा कसे | विभागाच्या एकूण सेवा किती आहेत. | किती सेवांसाठी दि. ९/३/२०१५ पूर्वी शपथपत्र घेण्यात येत होते | किती सेवांसाठी दि. ९/३/२०१५ नंतर स्वघोषणापत्र घेण्यात येत आहे. | किती सेवांसाठी दि. ९/३/२०१५ पूर्वी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती घेण्यात येत होत्या | किती सेवांसाठी दि. ९/३/२०१५ नंतर कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती घेण्यात येत आहे. | दि.९/३/२०१५ च्या शासन निर्णयानंतर कोणत्या सेवांसाठी शपथपत्राऐवजी घोषणापत्र स्वीकारावे व कोणत्या सेवांसाटी कागदपत्रांच्या साक्षांकनाऐवजी स्वसाक्षांकन स्विकारण्यात येते याबाबत अधिनस्त कार्यालयांना निदेश देण्यात आले आहेत काय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

कार्यालयांच्या विभागप्रमुखांचे
नाव , पदनाम व स्वाक्षरी